SBC3 CENTRE FOR SOCIAL AND BEHAVIOUR CHANGE COMMUNICATION

महिला व बाल विकास
WOMEN & CHILD DEVELOPMENT

unicef
for every child




# 'बालविवाह विरोधी लढा'- मुलांच्या सक्षमतेच्या दिशेने

## विद्यार्थी सत्रासाठी मार्गदर्शक पुस्तिका

सक्षम SAKSHAUM

# ऋणनिर्देश

२०१८ पासून, सेंटर फॉर सोशल अँड बिहेवियर चेंज कम्युनिकेशन (SBC³) ने युनिसेफच्या भागीदारीत महाराष्ट्र शासनाच्या महिला आणि बाल विकास विभाग आणि जिल्हा प्रशासनांसह महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांमध्ये बालविवाह निर्मुलनासाठी करण्यासाठी कार्य केले आहे.

"सक्षम" या कार्यक्रमाद्वारे छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, सोलापूर, नाशिक, धुळे आणि जळगाव या जिल्ह्यांमधील बालविवाहाच्या मुळ कारणांचा शोध घेऊन त्यांच्यावर काम करण्यात आले आहे.विविध विभागांच्या एकत्रित कार्यां द्वारे, जिल्हा टास्क फोर्स (डिस्ट्रिक्ट टास्क फ़ोर्स) आणि जिल्हा कृती आराखड्याच्या (डिस्ट्रिक्ट एक्शन प्लॅन) माध्यमातून मोठ्या प्रमाणात जनजागृती, सामुदायिक सहभाग आणि असुरक्षित कुटुंबातील किशोरवयीन मुलींना आवश्यक सेवा पोहोचविण्याचे प्रयत्न यशस्वीरित्या केले गेले आहेत. हे सर्व महिला आणि बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, तसेच १२ जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सातत्यपूर्ण आणि गतिशील नेतृत्वामुळे शक्य झाले आहे.

लिंगभेद, खोलवर रुजलेली पितृसत्ता आणि प्रतिकूल लिंगभेद – जे बालविवाहाचे प्रमुख कारण आहेत – यांचा सामना करण्यासाठी युनिसेफ आणि SBC³ यांनी या १२ जिल्ह्यांतील शिक्षण विभागासह सहकार्य केले आहे. २०२२ पासून चालू असलेल्या शालेय विद्यार्थ्यांसाठी (६ वी ते १० वीच्या मुला-मुलींसाठी) क्रियाकलाप-आधारित लिंग परिवर्तनकारी कार्यक्रम राबविण्यात आला आहे, ज्यामध्ये २,५५,१०२ मुला-मुलींचा समावेश झाला होता. याच बरोबर पालकांसाठी लिंगभाव आणि पालकत्व यावर सत्र आयोजित करण्यात आले होते, पालकांसोबतच्या संवादात्मक सहभागामुळे परिवर्तनासाठी सक्षम आणि समर्थनात्मक वातावरण निर्माण करण्यात मदत होत आहे.

आम्ही सर विठ्ठलदास ठाकरसी ठक्करशी महाविद्यालयाच्या मास कम्युनिकेशन आणि एक्स्टेंशन विभाग, एसएनडीटी विद्यापीठ आणि त्यांच्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानतो, ज्यांनी या क्रियाकलापांचा विकास आणि प्रारंभिक चाचणी केली. या मॉड्यूलसाठी त्यांच्या मौल्यवान योगदानाबद्दल आम्ही विशेष आभार व्यक्त करतो.

आम्ही पुढील दोन वर्षांत १२ जिल्ह्यांतील ३००० शाळांमध्ये हे मॉड्यूल अंमलात आणत असताना, आम्ही शाळा व्यवस्थापन, शाळा शिक्षक आणि भागीदार स्वयंसेवी संस्थांचे आभार मानतो, जे जवळपास ४,२०,००० मुलांपर्यंत हा कार्यक्रम पोहोचविण्यासाठी आम्हाला आणि या कार्याला सहकार्य करतील. हा सहकार्यात्मक प्रयत्न मुलींसाठी सुरक्षितता निर्माण करण्यात, त्यांच्या स्वायत्ततेची वाढ करण्यात, वृत्ती बदलण्यात आणि लिंगभेद भावना बदलण्यात मोठी मदत करेल, ज्यामुळे बालविवाह रोखण्यात योगदान मिळेल असा आम्हाला विश्वास आहे.

धन्यवाद!

SBC³ आणि युनिसेफ महाराष्ट्र

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | ७ |
| २. | स्वयंसेविकेचा परिचय | ९ |
| ३. | गीत | १० |
| ४. | भविष्यमार्ग खेळ | ११ |
| ५. | कथा (गीता आणि सविता) | १६ |
| ६. | लिंग भूमिका खेळ | २० |
| ७. | स्वयंसेविकेसाठी  सूचना | २४ |
| ८. | विद्यार्थ्यांचे मॉड्यूल - स्वयंसेविकांसाठी मार्गदर्शिका | २६ |





# प्रस्तावना

बाल विवाह ही एक जागतिक समस्या आहे. भारत जगातील सर्वाधिक बाल विवाह होत असलेला देशांपैकी एक आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण - ५ (२०१९-२०२१ ) नुसार भारतात २५.४% इतके बालविवाह होत असताना आपल्याला पाहायला मिळतात, तर महाराष्ट्रात २१.९% बाल विवाह होत आहेत. महाराष्ट्रात कोविड कालावधी नंतर बाल विवाहाचे अधिक परिणाम झाल्याचे दिसून आले आहे, त्याची विविध कारणे असल्याचे दिसून येते. बहुआयामी दारिद्य, नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ति, स्थलांतरा मुळे मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याने तिचे लवकर लग्न लावून देणे ह्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येत आहे. बालविवाहाला सामाजिक मान्यता मिळत आहे, त्यामुळे ज्या घरात रूढी परंपरा व स्त्री - पुरुष असमानता आहे अशा ठिकाणी आपल्याला बाल विवाह होत असल्याचे दिसत आहे. कोविड काळात ऑनलाईन पद्धतीने मिळत असलेल्या शिक्षणामुळे, ग्रामीण तसेच खेड्यातील मुलींच्या शिक्षणाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत अनेक मुलींचे शिक्षण अर्धवट सोडून घरातील परिस्थिती मुळे घरची कामे, किंवा घराला आर्थिक पाठबळ देण्यासाठी कामावर जाणे, किंवा घरचे ओझे कमी करणेसाठी तिचे कमी खर्चात, कमी हुंड्यात लग्न करून देण्यात येत आहे. युनिसेफ आणि SBC[३] यांच्या मार्फत २०१८ मध्ये पार पडलेल्या स्वयंसेविका असे निदर्शनास आले की, शिक्षण आणि बाल विवाहाचा घनिष्ट सहसंबद्ध आहे.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार जर मुली शाळेत असतील आणि त्यांचे १० वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करतील तर त्यांचे १८ वर्षाच्या अगोदर लग्न होणार नाही. यामुळे त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवणे गरजेचे आहे. सदर पुस्तिकेत शालेय मुला-मुलीनंसाठी  विद्यार्थी सक्षमीकरण कार्यक्रमाबद्दल माहिती आणि स्वयंसेविकेसाठी सूचना दिल्या आहेत. नमूद सत्रांना एकूण लागणारा कालावधी १ तास असा आहे. हे सत्र इयत्ता ६वी ते १० विच्या विद्यार्थ्यांसोबत घेण्यात येणार आहे. सत्र ग्रामीण व शहरी भागातील शाळांमध्ये घेण्यात यावे, जिथे बालविवाह होण्याची शक्यता जास्त आहे, किंवा जेथे शाळाबाह्य मुलींची संख्या जास्त आहे.


# विद्यार्थी सक्षमीकरण सत्राची उद्दिष्टे



## उद्दिष्ट्ये

१) बाल विवाहाचे मुला-मुलींवर होणारे परिणाम खेळाच्या माध्यमातून समजावणे .

२) लग्नासाठी योग्य वय यावर चर्चा करणे.



३) जीवनावर सकारात्मक परिणाम करण्याऱ्या निर्णयांमध्ये मुलांचा सहभाग आवश्यक व सक्षम करणारा आहे, हे समजावणे.

४) बालकांना चाइल्ड हेल्प लाइन बद्दल जागृत करणे.

# स्वयंसेविकेचा परिचय व वातावरण निर्मिती



**कालावधी**
७ मिनिटे

**लागणारे साहित्य**
काही नाही

**कृतीचे ठिकाण**
वर्गखोली

## कृतीचे उद्देश

१) स्वयंसेविकेने स्वतःची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे.
२) विद्यार्थी सत्राची माहिती करून देणे.

## प्रक्रिया

स्वयंसेविका विद्यार्थ्यांना स्वतःची ओळख करून देईल आणि विद्यार्थ्यांना अर्धवर्तुळात बसवेल.

साधन व्यक्ती विद्यार्थ्यांना विचारावे, 'तुम्हाला शिकून मोठे झाल्यावर काय बनायचे आहे? आणि ते त्यांना का बनायचे आहे?' या विषयी चर्चा करेल. सत्रात करण्यात येणाऱ्या कृतींबाबत माहिती देईल. स्वयंसेविका स्वतःचा खालील प्रमाणे परिचय करून देऊ शकतात.



# कृतीचे नाव -
# बालविवाह निर्मूलन गीत



**कालावधी**
१० मिनिटे

**लागणारे साहित्य**
काही नाही

**कृतीचे ठिकाण**
वर्ग खोली

### कृतीचा उद्देश

मुलांसाठी बाल विवाह निर्मूलनाचे गीत गाणे. जे सत्राच्या सुरुवातीला किंवा सत्राच्या शेवटी गायले जाऊ शकते.

### प्रक्रिया

स्वयंसेविका  मुलांचा खेळ सुरू करण्याआधी गाण्याचा परिचय करून देण्यासाठी संवाद साधेल आणि मुलांना समजवेल की, आपण सर्वजण वेगवेगळे सण साजरे करतो त्यामध्ये गणेश चतुर्थी हा सण आपल्या सर्वांना माहित आहे. गणेश चतुर्थीला आपण वेगवेगळी गाणी गातो. जसे १,२,३,४.. या गाण्याचे उत्तर देण्यासाठी स्वयंसेविका मुलांना प्रवृत्त करेल. या गाण्याच्या चालीवर स्वयंसेविका  बालविवाह विषयीचे गाणे गाऊन दाखवेल. गाण्याचे बोल छायाचित्रात लिहल्याप्रमाणे असतील.




मुलं गाण्याची पुनरावृत्ती करतील आणि सत्राच्या सुरुवातीला किंवा सत्राच्या शेवटी गातील.

# कृतीचे नाव - खेळ (भविष्याचा मार्ग)




**कालावधी**
२५ मिनिटे

**लागणारे साहित्य**
डोळ्यांवर बांधण्यासाठी पट्टी (रुमाल), ८ A4 आकाराचे चार्ट पेपर, खडू / मार्कर

**कृतीचे ठिकाण**
वर्ग खोली

**कृतीचा उद्देश**

मुलांना याचा अनुभव देणे की, डोळ्यावरील पट्टी असे दाखवते की, जीवनातील निर्णय हे योग्य ज्ञानाशिवाय घेतले जात नाहीत किंवा कोणाच्या प्रभावाखाली ही घेतले जात नाहीत. तसेच जर त्यांनी ते निर्णय योग्य ज्ञानाशिवाय किंवा कोणाच्या प्रभावाखाली घेतले तर ते त्यांना अनपेक्षित गोष्टींकडे नेऊ शकतात त्यासाठी ते एक व्यक्ती म्हणून तयार नसतील.




## प्रक्रिया




- स्वयंसेविका ६-८ विद्यार्थ्यांना खेळाचे सहभागी म्हणून निवडेल. या खेळाची त्यांना ओळख करून दिली जाईल जो खेळ त्यांचे भविष्य ठरवणार आहे "भविष्याचा मार्ग."
- स्वयंसेविका ८ चिठ्ठ्या सर्व विद्यार्थ्यांना वाचून दाखवतील व त्या ८ चिठ्ठ्या जमिनीवर वर्तुळात ठेवतील.
- स्वयंसेविका एका खडूने वर्तुळाची २ भागांमध्ये विभागणी करेल, ती वर्तुळाच्या मधल्या भागात विद्यार्थ्यांना उभे करेल आणि विद्यार्थ्यांच्या डोळ्यावर पट्टी बांधेल.
- स्वयंसेविका उर्वरित विद्यार्थ्यांना टाळ्या वाजवून गाणे गायला सांगतील.
- डोळ्यावर पट्टी बांधलेले विद्यार्थी वर्तुळामध्ये फिरतील.
- गाणे पूर्ण झाल्यावर विद्यार्थी जिथे आहेत तिथेच उभे राहतील आणि ज्यांच्या डोळ्यावर पट्टी बांधली आहे, त्यांना ३ वेळा गोल फिरवले जाईल आणि डोळ्यांवर पट्टी बांधलेली असताना वर्तुळाच्या एका बाजूला जाण्यास सांगितले जाईल.
- ज्या विद्यार्थ्यांच्या डोळ्यावर पट्टी आहे त्यांची पट्टी काढून त्यांना विचारले जाईल की, ते उभे असलेल्या बाजू बद्दल त्यांना काय वाटते आणि त्याबाबत ते आनंदी आहेत का आणि असे का? स्वयंसेविकेने विद्यार्थ्यांचे ऐकून घ्यावे, पण कुठलीही चर्चा सुरू करू नये.






लवकर लग्न
कुपोषित मुल
अपुरे शिक्षण
मानसिक त्रास
आर्थिक अडचणी
सहभागी
निरोगी स्वास्थ्य
आर्थिक स्वातंत्र्य
पौष्टिक आहार
उच्च शिक्षण
१८-२१ वयानंतर लग्न





लवकर लग्न
कुपोषित मुल
अपुरे शिक्षण
मानसिक त्रास
आर्थिक अडचणी
सहभागी
निरोगी स्वास्थ्य
आर्थिक स्वातंत्र्य
पौष्टिक आहार
उच्च शिक्षण
१८-२१ वयानंतर लग्न




स्वयंसेविका पुढील मुद्दे मुलानं सांगून, कृतीची समाप्ती करेल. बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ नुसार मुलींचे १८ वर्षांच्या आधी किंवा मुलाचे २१ वर्षांच्या आधी लग्न केल्यास तो गुन्हा आहे, तरी "भविष्याचा मार्ग" ह्या खेळाच्या माध्यमातून आपण मुलांना लवकर लग्न झाल्याने होत असलेले परिणाम व १८ वर्षाच्या नंतर लग्न झाल्यास मिळणाऱ्या संधी या विषयी माहिती देत आहोत.

१) लवकर लग्न केल्यामुळे मुली ह्या आपले शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत तसेच उच्च शिक्षण न मिळण्याने जीवनातील सर्वांगीण विकासाच्या संधी त्यांच्यापासून हिरावून घेतल्या जातात.
२) शिक्षण पूर्ण न केल्यामुळे महिलांमध्ये गरीबीचे प्रमाण वाढते व त्या आर्थिक दृष्टीने सक्षम बनत नाहीत.
३) लवकर लग्न झाल्यामुळे कुटुंबाची जबाबदारी लवकर पडल्यामुळे मुली स्वतःची काळजी घेऊ शकत नाही. त्यामुळे त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होतो.



४) लवकर लग्नानंतरच्या बाळंतपणातील जटिलतेमुळे तसेच वारंवार होणाऱ्या गर्भधारणेमुळे अनेक आरोग्याच्या समस्या निर्माण होतात.

५) बाळाला जन्म देण्यासाठी योग्य त्या पद्धतीने शरीर तयार नसल्याने मुलींचे गर्भपाताचे प्रमाण जास्त आहे, तसेच माता मृत्यू व बाल मृत्यूचे प्रमाण देखील जास्त आहे.

६) लवकर लग्न झालेल्या मुली ह्या मैत्रिणी, आई-वडील व शाळेपासून दुरावल्या गेल्याने तसेच अवेळी आलेली घरची व कुटुंबाची जबाबदारी, कौटुंबिक हिंसाचार ह्यामुळे मुलींना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते व त्यांचे मानसिक स्वास्थ्य ढासळते.

# कृतीचे नाव - कथा



**कालावधी**
१५ मिनिटे

**लागणारे साहित्य**
काही नाही

**कृतीचे ठिकाण**
वर्ग खोली

## कृतीचे उद्देश

१) कथेच्या माध्यमातून मुलांना लवकर लग्न केल्यामुळे जीवनावर होणारे परिणाम समजण्यास मदत करणे.
२) कथेच्या माध्यमातून लग्नासाठी योग्य वय ह्या संबंधी चर्चा घडवून आणणे.

## प्रक्रिया

स्वयंसेविका कथा सांगण्यासाठी मुलांची मानसिक तयारी करेल. कथेची सुरुवात कथेचे नाव सांगून करेल, कथा सांगत असताना मुलांचे लक्ष आहे की नाही हे समजण्यासाठी अधून मधून प्रश्न विचारतील.

आटपाट गावात दोन जिवलग मैत्रिणी राहत होत्या. एकीचे नाव होते गीता आणि एकीचे नाव होते सविता. गीताला गाणे गायला आवडायचे सविता मात्र पुस्तकात रमायची. (गीता आणि सविता ही दोन्हीही पात्र मुलांना समजण्यासाठी काही प्रश्न विचारा उदा. आपल्या वर्गात सविता आणि गीता सारख्या आहेत का कोणी मैत्रिणी?, एका मुलीकडे उद्देशून असे म्हणा की, गीता देखील तिच्यासारखी वेणी घालायची आणि अजून एका मुलीकडे पाहून असे म्हणा की, सविता देखील तिच्यासारखी खळखळून हसायची)



दोघीही एकाच शाळेत एकच वर्गात शिकायच्या. सवितापेक्षा गीता अभ्यासात हुशार होती. त्या १३ वर्षांच्या झाल्यानंतर, पालकांना त्यांच्या लग्नासाठी त्यांच्या नातेवाईकांचा दबाव येण्यास सुरवात झाली. सविता मात्र तिचे

शिक्षण सुरू ठेवण्यासाठी ठाम होती, पण अभ्यासात चांगली असलेली गीता लग्नासाठी खूप उत्सुक होती. एके दिवशी सविता आणि गीता गप्पा मारत बसल्या होत्या. गीता सविताला म्हणाली की, "माझी काकी मला म्हणाली की, मी आता मोठी झाली आहे आणि ते माझ्या लग्नासाठी मुलगा शोधत आहेत. नवीन कपडे, दागिने, मेकअप, मेहंदी, भेटवस्तू किती मज्जा !!! सविता, तू पण लग्न कर ना ? आपण दोघी एकाच मांडवात लग्न करूया."

सविता तिला म्हणाली की, "मला शिकून सवरून खूप मोठं व्हायचय आणि काहीतरी बनून आई बाबांना आर्थिक पाठबळ देयायच" असं म्हणून सविताने गीताच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले.



गीता मात्र आश्वासने आणि भेटवस्तूंमध्ये वाहून जाते आणि त्याला बळी पडून लग्न करते.

(इथे स्वयंसेविका मुलांना विचारतील की, गीता आणि सविताचे आयुष्य या घटनेनंतर कसे असेल? स्वयंसेविका त्यांना वरील दोन्ही परिस्थितींबद्दल विचार करण्यास प्रवृत्त करेल. उदा. गीताचे आता लग्न झाले आहे तर तुम्हाला काय वाटते तिचे आयूष्य कसे असेल? तसेच सविताने आपले शिक्षण सुरू ठेवले आहे तर तिचे आयुष्य कसे असेल ?)

एकदा ह्यावर चर्चा झाल्यावर ह्यापैकी गीता आणि सविताच्या बाबतीत काय गोष्टी घडल्या हे पाहूया असे सांगून कथा पुढे सुरू ठेवावी. गीता घरातील कामात आणि शेतात काम करण्यात व्यस्त होती. खूप कमी अन्न आणि खूप मेहनत घेऊन ती दिवसाच्या अखेरीस खूप थकलेली असायची.

सविताचे आयुष्यही गुलाबाच्या पलंगाने भरलेले नव्हते. जरी तिला तिच्या वडिलांचा पाठिंबा मिळत असला तरीही तिची आई तिच्यात आणि तिच्या भावात, सतत भेदभाव करत होती. सविताच्या आईच्या म्हणण्यानुसार, मुलीपेक्षा मुलाच्या शिक्षणामध्ये गुंतवणूक करणे अधिक फायद्याचे आहे, कारण मुलगी ही दुसऱ्या घरची संपत्ती आहे म्हणून बाईने फक्त घरी राहून घरची कामं केली पाहिजे, मुलांचे संगोपन आणि त्यांची काळजी घेतली पाहिजे हे एवढेच तिचे काम आहे. ज्यावर वडिलांचे म्हणणे आहे की, "जर आपण सविताला शिकवले तर ती केवळ स्वतः शिकणार नाही तर ती तिच्या येणाऱ्या पुढच्या पिढीला सुद्धा शिकवेल." अशा परिस्थितीत सविता तिचे शिक्षण घेत राहीली.

दुसऱ्या बाजूला गीता गरोदर राहते. कामाचे ओझे कमी न झाल्याने, गीता खूप अशक्त होते आणि मोठ्या कष्टाने आणि जीवघेण्या परिस्थितीत एका बाळाला जन्म देते. बाळाच्या जन्मानंतर, ती अशक्त होऊन तिच्या दैनंदिन जीवनात परत येते. ती बाळाला आहार आणि योग्य पोषणही देऊ शकत नाही. याउलट सविता मात्र तिचा वेळ अभ्यासात घालवते आणि तिची कौशल्ये वाढवते जी भविष्यात तिच्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.



कापणीच्या हंगामात महाराष्ट्रातील शेतकरी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित होतात, त्याच पद्धतीने सविताच्या परिवाराने सुद्धा स्थलांतर केल्यामुळे त्यांच्या मनात सविताच्या एकटे राहण्याचा आणि तिच्याकडे लक्ष न राहण्याचा विचार निर्माण होतो. त्यांना असे वाटते की, ज्या मुली घरी एकट्या राहतात त्या सुरक्षित नसतात. काम करून सविताने जिद्दीने तिच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तिचे शेवटचे वर्ष यशस्वीरित्या पूर्ण केले, आणि शिक्षकांच्या माध्यमाने तिला कळले की, काम करून पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी मुली तसेच महिलांसाठी सरकारकडून राहण्याच्या सुविधा आहेत, ज्या पूर्णपणे सुरक्षित आहेत. जिथे त्या त्यांचे कौशल्य वाढवून शिकूही शकतात आणि स्वतःसाठी कमावण्याची संधीही मिळवू शकतात.

इथे मात्र गीताला तिच्या पतीसोबत दरवर्षी उसाच्या शेतात राबण्याशिवाय पर्याय राहत नाही. दिवसेंदिवस तिची तब्येत खराब होत जाते. यासोबतच शेतात काम करत असताना तिसऱ्या वर्षी ती आणखी एकदा गरोदर राहते.

तिथे ऊस तोडत असताना गीताला चुकून शारीरिक दुखापत होते, ती अशक्त असल्याने तिला कोयता नीट चालवता येत नसतो. तिचा नवरा तिला घाईघाईने जवळच्या दवाखान्यात तिच्यावर प्राथमिक उपचार करण्यासाठी घेऊन जातो.

तिथे मात्र एक आश्चर्याची गोष्ट पाहण्यास मिळते, गीताच्या जखमेवर उपचार करणारी महिला दुसरी कोणी नसून सविताच असते. सविता कुशल परिचारिका (नर्स) असते. ती सुंदर आणि निरोगी दिसत असते.



गीताची अवस्था पाहून सविताला वाईट वाटते, एकेकाळी अत्यंत हुशार आणि देखणी असलेली मुलगी हाडांच्या सापळ्यात बदलली होती, तिच्या चेहऱ्यावर कसलेच तेज नव्हते.

कमी वयात लग्न होण्याच्या धोक्यांपासून सविता तिच्या मैत्रिणीला मदत करू शकली नाही किंवा पटवून देऊ शकली नाही याचे दुःख तिला वाटते.

या गोष्टीच्या अखेरीस स्वयंसेविका मुलांना विचारेल की, त्यांनी गोष्टीच्या सुरवातीला सविता आणि गिताच्या आयुष्यासंदर्भात मांडलेल्या विचारांमध्ये सारखेपणा आढळला आहे की नाही.

या चर्चे सोबतच स्वयंसेविका मुलांचे विचार जाणून घेतील की, त्यांना गीता सारखे की सविता सारखे आयुष्य जगायचे आहे. साधन व्यक्ती प्रश्नाच्या माध्यमाने मुलांच्या भावना जाणून घेण्याचा प्रयत्न करेल, "गीताचे आयुष्य पाहून तुमच्या मनात काय भावना आल्या, आणि सविताचे आयुष्य पाहून तुमच्या मनात काय भावना आल्या. जसे की, गीताच्या बाबतीत दूःख झाले, वाईट वाटले, भीती वाटली, असुरक्षित वाटले, आणि सविताच्या बाबतीत आनंद झाला, बरे वाटले, उत्साह आला इत्यादि.

हे गीत, कथा आणि चर्चा ऐकल्यानंतर तसेच स्वयंसेविका सविस्तर माहिती दिल्यानंतर मुले स्वतःचे मत तयार करण्यास सक्षम होतील. स्वयंसेविका त्यांना समजावून सांगेल की, जसे इथे तुम्ही स्वतःचे मत मांडू शकलात तसेच तुमच्या विवाहाच्या संबंधी देखील तुम्ही तुमचे मत मांडू शकता.

पुढील खेळामागील मुख्य कल्पना म्हणजे लिंग भूमिका या विषया संबंधी संभाषण सुरू करणे. स्वयंसेविका याविषयावर चर्चा सुरू ठेवण्यासाठी दोन विद्यार्थ्यांना ( एक मुलगा, एक मुलगी) यांना पुढे बोलवतील आणि प्रत्येकी दोघांनाही प्रश्न विचारतील जसे की मुलीला विचारतील की, तुझा आजचा दिवसभराचा दिनक्रम काय असेल? आणि मुलाला विचारतील की, तुझा आजचा दिवसभराचा दिनक्रम काय असेल? हे विचारून साधन व्यक्ती खेळाला सुरवात करतील.

# कृतीचे नाव - लिंग भूमिका खेळ



**कालावधी**
२० मिनिटे

**मुलांसाठी लागणारे साहित्य**
सुई आणि धागा, पुस्तक कव्हर, 4 प्रकारच्या वेगळ्या डाळी (उदा. उडीदडाळ, मूगडाळ, तूरडाळ, चना डाळ)

**मुलींसाठी लागणारे साहित्य**
कागदी बनवलेल्या नोटा किंवा खोट्या नोटा, लगोरी (दगडांचा थर), बेंच

**कृतीचे ठिकाण**
वर्ग खोली

## कृतीचे उद्देश

१) मुलांना लिंगभावाची संकल्पना समजावणे
२) दैनंदिन जीवनातील मुलगा व मुलगी यांना लिंगभावाच्या परिणामांची माहिती देणे.

## प्रक्रिया

स्वयंसेविका मुलांना विचारतील की, जर मुली आणि मुलांनी त्यांच्या नियमित जीवनात त्यांच्या भूमिकांची अदलाबदल केली तर काय होईल? या चर्चेनंतर स्वयंसेविका या खेळाची सर्वांना ओळख करून देईल. (मुली ज्या बाबी करतात त्या मुलं करू शकतील का आणि मुलं करतात त्या बाबी मुली करू शकतील का? ते बघूया).

## स्वयंसेविकेसाठी सूचना

मुलांसाठी/ मुलींसाठी ३ खेळ आहेत. प्रत्येक खेळात ३ विद्यार्थी खेळतील आणि ते खेळ त्यांना वेळेत पूर्ण करावे लागतील.



स्वयंसेविका नंतर विद्यार्थ्यांना या खेळांची ओळख करून देतील आणि कृती बद्दल माहिती देण्यास सुरवात करतील.

## प्रक्रिया


स्वयंसेविकेने मुलांना हि सूचना देणे गरजेचे आहे की, मुलाने/मुलीने कृती सुरू केल्यानंतर ती कृती पूर्ण करून दुसऱ्या मुलाकडे/मुलीकडे सोपवायची आहे तसेच दुसऱ्या मुलाने/मुलीने ती तिसऱ्या मुलाकडे / मुलीकडे सोपवायची आहे.

## मुलींसाठी

**कृती १ :**

लगोरी - खेळाची सुरवात झाल्यानंतर पहिल्या मुलीला वेगवेगळ्या आकारांच्या दगडांच्या मदतीने शक्य तितक्या लवकर ७ दगडांची लगोरी तयार करावी लागणार आहे. तिने लगोरी पूर्ण केल्यानंतर ती धावून, खेळ दुसऱ्या मुलीकडे सोपवेल.







**कृती २ :**

बेंच हलवणे - दुसऱ्या मुलीला वर्गातील बेंच डावीकडून उजव्या बाजूला हलवावे लागतील (किमान ३ बेंच). ते झाल्यानंतर ती तो खेळ तिसऱ्या मुलीकडे सोपवेल.

**कृती ३ :**

खोट्या नोटा घेऊन त्यातून महिन्याचा खर्च ठरवणे- मुलीला खोट्या नोटा देण्यात येतील (ठराविक किंमत ठरवून नोटा दिल्या जातील, उदा. ४५०/५०० रू. ) आणि स्वयंसेविका त्यांना सांगेल की, ह्या पैशातून महिन्याचा खर्च ठरवायचा आहे ? व तो एका कागदावर लिहून द्यायचा आहे.





## मुलांसाठी

**कृती १ :**
सुई धागा - खेळात ठरवल्याप्रमाणे तीनही विद्यार्थी एका काल्पनिक त्रिकोणाच्या 3 कोपऱ्यांवर बसतील. एक मुलगा सुईमध्ये धागा ओवण्यास सुरुवात करेल आणि सुई ओवून झाल्यानंतर दुसऱ्या कोपऱ्यात असलेल्या मुलास सोपवेल.

**कृती २ :**
पुस्तक कव्हरिंग- मग दुसरा मुलगा पुस्तक कव्हर लावण्यासाठी वर्तमानपत्राचा वापर करेल. तो पूर्ण झाल्यावर तो तिसऱ्या मुलाकडे सोपवेल.






**कृती ३ :**
४ प्रकारच्या डाळी वेगवेगळ्या करणे - तिसऱ्या मुलाला ४ प्रकारच्या डाळी मिक्स करून दिलेल्या असतील तो त्या वेगवेगळ्या करेल. आणि तिथेच खेळ संपेल.

## उद्देश

- सर्व खेळ संपल्यानंतर स्वयंसेविका विद्यार्थ्यांना सांगतील की, त्यांनी आज त्यांची भूमिका बदलली असली तरीही ते पूर्वी कधीही न केलेले काम किंवा खेळ कसे करू शकले.
- या खेळाची नैतिकता अशी आहे की, मुली आणि मुले नैसर्गिकदृष्ट्या भिन्न आहेत किंवा त्यांची शक्ती भिन्न असली तरीही काही कामे/ जबाबदऱ्या अशा आहेत जे मूले आणि मुली दोघेही करू शकतात.
- लिंग हा नैसर्गिक दृष्ट्या मुलगा आणि मुलगी यांच्यातील फरक आहे परंतु लिंगभाव म्हणजे सामाजिकरित्या मुलगा व मुलगी/स्त्री व पुरुष यांच्या समाजातील भूमिका ठरवण्यात येतात. समाज मुले आणि मुलींना त्या भूमिकांचे पालन करण्यास भाग पाडतो.
- लिंग भूमिकांवर आधारित सर्व काम मुलगा आणि मुलगी दोघेही करू शकतात. स्वयंसेविका नंतर विद्यार्थ्यांना या विषयावर बोलण्यासाठी आमंत्रित करेल.



## निष्कर्ष

खेळ पूर्ण झाल्यानंतर स्वयंसेविका १,२,३,४, हे गाणं गाऊन त्यांना पुनरावृत्ती करण्यास सांगतील.

## स्वयंसेविकेने सत्राची सांगता पुढील प्रमाणे करावी.

आपण ज्या समस्येबाबत आज बोललो आहोत ती खूप गंभीर समस्या आहे. मी आशा करतो/ करते की, तुम्ही सर्व आमच्या ह्या ध्येयामध्ये आमची साथ द्याल. तुमच्या जीवनात आज तुम्ही जे काही शिकलात त्याचे पालन कराल आणि एकत्र पुढे प्रगतीकडे वाटचाल कराल.. धन्यवाद...

# स्वयंसेविकांसाठी इतर सूचना

### प्रक्रियेविषयी

१. कार्यक्रम कधी सुरू करावा?

वरिष्ठांनी दिलेल्या वेळेत कार्यक्रम सुरू करा.

२. वर्गखोलीत प्रवेश कसा करावा?

शांतता ठेवा, चेहऱ्यावर स्मितहास्य ठेवा.

३. कृतीसाठी काही सामान नसल्यास काय करावे?

स्वयंसेविकेने उपलब्ध असलेल्या संसाधनाचा वापर करावा.

४ वर्गात बोर्ड नसेल तर काय करायचे?

तुम्ही लिहिण्यासाठी कागद / चार्ट पेपर/ ड्रॉइंग शिट वापरू शकता आणि तै धरण्यासाठी मुलांची मदत घेऊ शकता. किंवा संवाद चर्चेद्वारे सुद्धा करू शकता.

५. मुलांना कळेल की, कोणाबद्दल बोलले जात आहे. मुलांना तुमच्या कथेत गुंतवून ठेवा, त्याच्यानुसार पुढे काय होईल ते त्यांना विचारा.



### ६. विद्यार्थ्यांशी संवाद कसा साधायचा?

सर्वप्रथम, सुरुवातीला परिचयाने सुरुवात करा, त्या बदल्यात त्यांना स्वतःची ओळख करून देण्यास सांगा, तुम्ही स्वतःबद्दलही बोला जेणेकरून ते तुमच्यासोबत बोलण्यासाठी तयार होतील, त्यांना खेळ समजावून सांगा, त्यांना कृतीबद्दल काही प्रश्न असल्यास त्यांना विचारा, प्रश्न असल्यास कृपया त्यांना पुन्हा समजावून सांगा, आणि कृती / सत्र संपल्यानंतर, त्यांना विचारा की, त्यांना कृती/ सत्र कसे वाटले, त्यांनी त्याचा आनंद घेतला का, इ.

### ७. भूमिका उलट करण्याची ही क्रिया आपण का करत आहोत?

जेणेकरुन आपल्याला समजेल की, आपल्याला ज्या भूमिका दिल्या जातात त्या समाजाने दिलेल्या आहेत, समाजाद्वारेच रूढीवाद तयार होतो. समानता म्हणजे काय? हे देखील समजण्यासाठी आपण सर्वजण यापैकी कोणतीही भूमिका करू शकतो मग ती विशिष्ट लिंगासाठी का राखून ठेवली जाते.

## सहकार्य विषयी

### ८. आम्हाला अभ्यास करायचा असेल पण आमच्या घरची आर्थिक परिस्थिती नसेल तर? ( असे प्रश्न तुमच्यासमोर आल्यास)

मुलांसाठी मोफत शिक्षणासाठी अनेक सरकारी योजना आहेत, तुम्ही त्यांचा नेहमी लाभ घेऊ शकता, (स्वयंसेविका योजनांचा उल्लेख करतील)

### ९. खुलासे हाताळणे:

विद्यार्थ्यांनी कोणताही बालविवाह होणार असल्याचे उघड केल्यास, जिल्ह्यातील संबंधित विभाग अथवा चाइल्ड हेल्प लाईन / SBC[3] प्रकल्प समन्वयकाला कळवावे.

**महत्वाच्या सूचना**

१. स्वयंसेविकेने विद्यार्थ्यांसोबत मोबाईल नंबरची देवाणघेवाण करू नये.

२. कोणत्याही मुलांचे वैयक्तिक फोटो काढू नये.

# विद्यार्थ्यांचे मॉड्यूल - स्वयंसेविकांसाठी मार्गदर्शिका

## विद्यार्थी सक्षमीकरण कार्यक्रम

- **विद्यार्थी सक्षमीकरण कार्यक्रमाचे तीन भाग आहेत**. शाळेला स्वयंसेविकेच्या पहिल्या भेटीदरम्यान **भाग १** पूर्ण होईल. भाग १ मध्ये, स्वयंसेविका प्रशिक्षण मॅन्युअलमध्ये स्पष्ट केलेल्या क्रियाकलाप पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांसोबत सत्र आयोजित करतील. इयत्ता ६ वी ते १० वी मधील सर्व विद्यार्थ्यांना कव्हर करण्यासाठी तिला त्या दिवशी एकापेक्षा जास्त सत्र आयोजित करण्याची किंवा अतिरिक्त दिवशी भेट देण्याची आवश्यकता असू शकते. मॅन्युअलमध्ये स्पष्ट केलेले सर्व क्रियाकलाप पूर्ण करण्यासाठी प्रत्येक सत्राला सुमारे ९० ते १२० मिनिटे लागतील.

- स्वयंसेविका कार्यक्रमाच्या **भाग २** मध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या उपक्रमांबद्दल चर्चा सुरू करण्यासाठी सत्रापूर्वी आणि नंतर शाळेच्या मुख्याध्यापकांना भेटतील. भाग २ मध्ये नमूद केलेले उपक्रम शाळेत भाग १ सत्र पूर्ण झाल्यानंतर चार महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे.

- कार्यक्रमाचा **भाग ३** हा स्वयंसेविकेच्या शाळेच्या दुसऱ्या भेटीच्या वेळी 'उजळणी सत्र' म्हणून आयोजित केला जाईल. दुसऱ्या भेटीत, स्वयंसेविकेला विद्यार्थ्यांसाठी भाग ३ - उजळणी सत्र घ्यायचे आहे. (या सत्रासाठी तेच विद्यार्थी उपस्थित असतील ज्यांनी स्वयंसेविकेने आयोजित केलेल्या भाग १ मध्ये भाग घेतला होता.)

| विद्यार्थी सक्षमीकरण कार्यक्रम | | |
|---|---|---|
| भाग १ | पहिली भेट (जून ते ऑगस्ट) | ६ वी ते १० वी तील विद्यार्थ्यांसाठीचे सत्र |
| भाग २ | पहिल्या आणि दुसऱ्या भेटीदरम्यानचा कालावधी (जून ते सप्टेंबर) | इयत्ता ६ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांसाठी शाळेद्वारे आयोजित केले जाणारे उपक्रम |
| भाग ३ | दुसरी भेट (ऑक्टोबर ते डिसेंबर) | उजळणी सत्र (६ वी ते १०वी तील विद्यार्थ्यांसाठीचे) |

## भाग १ उपक्रमाची तयारी:

१. स्थानिक कार्यक्रम भागीदार स्वयंसेवी संस्था(NGO) शाळेसोबत संवाद सुरू करेल आणि विद्यार्थी सक्षमीकरण कार्यक्रम (भाग १) साठी तारीख आणि वेळ निश्चित करेल. स्वयंसेविकेला हे तपशील (तारीख, वेळ, तपशील शाळेचे तपशील व पत्ता) स्थानिक कार्यक्रम भागीदार स्वयंसेवी संस्था NGO पर्यवेक्षकाकडून(सुपरवायझर) प्राप्त होतील.

२. सत्राला जाताना, स्वयंसेविका एक अधिकृत परवानगीपत्र घेऊन जाईल आणि आवश्यक असल्यास ते शाळेच्या मुख्याध्यापकांना दाखवेल. हे पत्र स्वयंसेविकेला प्रशिक्षणा दरम्यान प्रदान केले जाईल.

३. स्वयंसेविका नियोजित सत्राच्या वेळेच्या २०-३० मिनिटे अगोदर शाळेत पोहोचेल.

४. स्वयंसेविका शाळेच्या मुख्याध्यापकांना भेटेल, स्वतःची ओळख करून देईल आणि **विद्यार्थी सक्षमीकरण कार्यक्रम भाग २ – मार्गदर्शिका**, मुख्याध्यापकांना सुपूर्द करेल. ही मार्गदर्शिका पहिल्या आणि दुसऱ्या स्वयंसेविकेच्या भेटीदरम्यानच्या कालावधीत शाळेत करण्यात येणाऱ्या क्रियाकलापांसाठी सूचना प्रदान करेल. ही मार्गदर्शिका स्वयंसेविकेला प्रशिक्षण सत्रादरम्यान प्रदान केली जाईल.

५. स्वयंसेविका मुख्याध्यापकाना मार्गदर्शिके मध्ये असलेल्या सूचना समजावून सांगतील आणि **सक्षम मार्गदर्शक शिक्षिका** आणि **सक्षम दूत** कल्पना शाळेच्या मुख्याध्यापकांना सांगतील. शाळेचे मुख्याध्यापक नंतर **सक्षम मार्गदर्शक शिक्षिकेची** (मार्गदर्शक दस्तऐवजात नमूद केलेल्या निकषांनुसार) निवड करतील **सक्षम मार्गदर्शक** शाळेचे मुख्याध्यापक नंतर मार्गदर्शिके मध्ये नमूद केलेल्या निकषांनुसार ४ **सक्षम दूत** यांची निवड करतील.

६. **सक्षम मार्गदर्शक** आणि **सक्षम दूतना** भेटण्यासाठी स्वयंसेवक एक वेळ (त्याच दिवशी) देखील निश्चित करेल. या भेटीची वेळ विद्यार्थ्यांची सत्रे पूर्ण झाल्यानंतर ठरवली जाऊ शकते. या बैठकीदरम्यान स्वयंसेवक **सक्षम दूतसाठी** मेटल पिन/बॅज सुपूर्द करतील.

८. शाळेच्या मुख्याध्यापकांशी प्राथमिक चर्चा पूर्ण केल्यानंतर, स्वयंसेविका विद्यार्थ्यांसोबत सत्र घेण्यासाठी वर्गात जातील.

## भाग १: विद्यार्थ्यांसह क्रियाकलाप

**क्रियाकलापा पूर्वी**- लिंगभाव धारणा प्राथमिक मूल्यमापन करण्याची कृती (समाजात असलेल्या लिंग भूमिकेबद्दल मुलांचा समज जाणण्यासाठी काही मुलांना एक सोपी प्रश्नावली दिली जाईल, त्यासाठी पुढील सूचना पाळा.)

१. प्रत्येक सत्र सुरू होण्यापूर्वी सहभागी विद्यार्थ्यांची संख्या तपासा.
२. सत्राला उपस्थित असलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी १०% निवडा. (जर वर्गात ५० विद्यार्थी असतील तर १०% विद्यार्थी म्हणजे ५ विद्यार्थी असतील)

३. हे विद्यार्थी निवडताना त्यांच्यात मुले आणि मुलींची संख्या समान असावी (जर ५ विद्यार्थी असतील, तर स्वयंसेविका ३ मुले आणि ३ मुलींचे समान संख्या करण्यासाठी आणखी एक विद्यार्थी जोडू शकते )

४. विद्यार्थी निवडायची प्रक्रिया : प्रत्येक विद्यार्थ्याला १ ने सुरू होणारे नंबर कॉल करण्यास सांगणे, पहिला विद्यार्थी १ म्हणतो, दुसरा विद्यार्थी २ म्हणतो, असे करत शेवटचा विद्यार्थी, हजर विद्यार्थ्यांनुसार ५० किंवा ६० म्हणू शकतो. स्वयंसेविका नंतर ५ च्या गुणाकार असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना बाजूला होण्यास सांगेल आणि नंतर त्यांच्यामधून वरील दिलेल्या नियमांनुसार १०% विद्यार्थ्यांची निवड करेल. (ही कृती ५-७ मिनिटांमध्ये पूर्ण करायची आहे)

५. या १०% विद्यार्थ्यांना निवडल्यानंतर स्वयंसेविका त्यांना वर्गाच्या बाजूला किंवा वर्गाबाहेर एकत्र येण्यास सांगेल आणि त्यांना एक चित्र आधारित प्रश्नावली वितरीत करेल. (चित्र आधारित प्रश्नावली वेगळी पुरवली जाईल)

६. स्वयंसेविका या विद्यार्थ्यांना ही प्रश्नावली निर्धारित वेळेत पूर्ण करू देईल. (केवळ ५-७ मिनिट)

## क्रियाकलापास सुरवात (ॲक्टिव्हिटी)

मुलांनी चित्र आधारित प्रश्नावलीची उत्तरे भरून झाल्यानंतर स्वयंसेविकेकडे जमा करावे. यानंतर स्वयंसेविका विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण पुस्तकामध्ये (मॅन्युअलमध्ये) वर्णन केल्यानुसार विद्यार्थ्यांसाठी स्वयं परिचय/ खेळ / कथा / गाणे या उपक्रमांची सुरुवात करेल.

## भाग २ : सक्षम मार्गदर्शक, सक्षम दूत, आणि शाळेत घेण्यात येणारे उपक्रम

- विद्यार्थी सत्रापूर्वी, स्वयंसेविकाने शाळेच्या मुख्याध्यापकांशी **विद्यार्थी सक्षमीकरण कार्यक्रम भाग २ – मार्गदर्शिके** बद्दल चर्चा पूर्ण केलेली असावी. अशी अपेक्षा आहे की शाळेच्या मुख्याध्यापक **सक्षम मार्गदर्शक** शिक्षिकेची जबाबदारी स्वीकारू शकणाऱ्या महिला शिक्षिकेची निवड त्वरित करतील, आणि **सक्षम मार्गदर्शक** शिक्षिकेच्या साहाय्याने चार **सक्षम दूतची** निवड करतील.
- **सक्षम मार्गदर्शक** शिक्षिका ही संबंधित शाळेतील एक महिला शिक्षिका असेल, जी संवेदनशील असेल; मैत्रीपूर्ण, आणि सहकार्य करण्यायोग्य असेल आणि **सक्षम मार्गदर्शक** म्हणून जबाबदारी स्वीकारण्यास तयार असेल. तिने बालविवाह समाप्त करण्याची शपथ घ्यायला हवी. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडून तिची निवड केली जाईल. शाळेच्या

मुख्याध्यापकांनी खात्री करणे आवश्यक आहे की तिला स्वयंसेविकेने प्रदान केलेल्या मार्गदर्शिकेमधील माहिती दिली आहे. तिने विद्यार्थ्यांच्या किमान एका सत्रात तसेच पालक सत्रापैकी एकाला उपस्थित राहावे अशी अपेक्षा आहे.

- **सक्षम दूत** (एकूण ४) – या शालेय मुली आहेत, ज्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या भाग १ सत्रात सहभागी झालेल्या (किंवा उपस्थित राहणाऱ्या) विद्यार्थ्यांमधून निवडल्या जातील. या मुलींची निवड मुख्याध्यापक आणि **सक्षम मार्गदर्शक** शिक्षिकेकडून केली जाईल.
- **सक्षम दूतची** निवड खालील गोष्टींच्या आधारे केली जाईल – या चार मुली वेगवेगळ्या वर्गातील असाव्यात (६ वी-१० वी वर्ग). या मुली वर्गात नेहमी सक्रिय असतील, त्यांच्या सभोवतालच्या परिस्थितीबद्दल संवेदनशील असतील आणि शाळेत नियमित हजर राहत असतील. या मुली आत्मविश्वासु असतील, त्यांना स्पष्ट विचार मांडता येतील, त्यांच्याकडे नेतृत्व कौशल्यसुद्धा असायला हवे (वर्गात जबाबदारी घेणाऱ्या मुलींची निवड करता येईल).
- त्या दिवशीचे सर्व सत्रे संपल्यानंतर, स्वयंसेविका शाळेच्या मुख्याध्यापकांना भेटतील आणि **सक्षम मार्गदर्शक** शिक्षिका आणि **सक्षम दूत** ओळख करून घेतील . स्वयंसेविका नंतर मेटल पिन/बॅज (त्यांच्या शीर्षकासह) **सक्षम दूतना** सुपूर्द करतील. शाळेच्या मुख्याध्यापकांनी **सक्षम दूत** म्हणून सर्वांसमोर घोषित केल्यानंतर (कदाचित दुसऱ्या दिवशी) त्यांना त्यांच्या शाळेच्या गणवेशावर हे बॅज घालण्याची आवश्यकता असेल.
- त्यानंतर स्वयंसेवक **सक्षम मार्गदर्शक** शिक्षिका आणि **सक्षम दूत** यांच्यासोबत चर्चेसाठी बैठक बोलावतील. शाळेचे मुख्याध्यापक या चर्चेदरम्यान उपस्थित असणे अनिवार्य नाही आहे. स्थानिक कार्यक्रम भागीदार स्वयंसेवी संस्थेचे पर्यवेक्षक या चर्चेत त्यांच्याबरोबर सामील होतील.
- या बैठकीत, स्वयंसेविका **विद्यार्थी सक्षमीकरण कार्यक्रम भाग २ – मार्गदर्शिका** च्या ५ प्रती त्या सर्वांना सुपूर्द करतील आणि **सक्षम मार्गदर्शक** शिक्षिका आणि **सक्षम दूतच्या** भूमिका स्पष्टपणे समजावून सांगतील आणि मधील कालावधीत शाळेने आयोजित करावयाच्या क्रियाकलापांबद्दल त्यांना माहिती देतील. या क्रियाकलापांचे आयोजन स्वयंसेविकेच्या दुसऱ्या भेटीपूर्वी पुढील ३-४ महिन्यांत कारणे आवश्यक असेल .
- **सक्षम मार्गदर्शक** शिक्षिकेच्या मोबाईल फोनवर सुसंगत स्वरूपातील SAKSHUM Anthem Song (सक्षम गीत), याची ऑडिओ फाईल पाठवली जाईल. हे गाणे भाग २ दरम्यान शाळेने आयोजित केलेल्या स्पर्धा आणि उपक्रमांसाठी वापरले जायला हवे.
- भाग २ मध्ये **सक्षम मार्गदर्शक** आणि **सक्षम दूतची** मुख्य भूमिका खालील प्रमाणे असेल: **विद्यार्थी सक्षमीकरण कार्यक्रम भाग २ – मार्गदर्शिके** नुसार शाळेत स्पर्धात्मक उपक्रम राबविणे.

## फोटो दस्तऐवजीकरण

सर्व स्वयंसेविकेना त्यांच्या मोबाईलवर छायाचित्रे घेणे आवश्यक आहे. जेथे शक्य असेल तेथे स्थानिक कार्यक्रम भागीदार स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी फोटो देखील घेऊ शकतात. फोटो काढण्यापूर्वी स्वयंसेविका / पर्यवेक्षकाला मुख्याध्यापकांनी स्वाक्षरी केलेला संमती फॉर्म (सामंजस्य करार दस्तऐवजाचा परिशिष्ट ३) घेणे आवश्यक आहे. हा स्वाक्षरी केलेला संमती फॉर्म चित्रांसह SBC[3] च्या स्थानिक टीमला वेळच्यावेळी सबमिट करणे आवश्यक आहे.

## भाग ३: उजळणी सत्र (स्वयंसेविकेची दुसरी भेट)

**विद्यार्थी सक्षमीकरण कार्यक्रमाच्या भाग ३** मध्ये, स्थानिक कार्यक्रम भागीदार स्वयंसेवी संस्थेचे पर्यवेक्षक शाळेमध्ये एक उजळणी सत्र आयोजित करण्यासाठी मुख्याध्यापकांकडून परवानगी मिळवतील (भाग १ मध्ये केल्याप्रमाणे) आणि हे उजळणी सत्र आयोजित करण्यासाठी स्वयंसेवकाशी समन्वय साधतील. **विद्यार्थी सक्षमीकरण कार्यक्रमाचा भाग ३** ऑक्टोबर ते डिसेंबर (सुट्ट्या लक्षात घेऊन) आयोजित केला जाऊ शकतो. उजळणी सत्रासाठी, तेच विद्यार्थी उपस्थित असतील जे भाग १ च्या सत्रासाठी उपस्थित होते.

स्वयंसेवकांसाठी उजळणी सत्र प्रशिक्षण स्वतंत्रपणे आयोजित केले जाईल आणि त्यासाठी स्वतंत्र पुस्तिका प्रदान केली जाईल.